के. सी. ई. सोसायटी संचालित

# मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव

"An Autonomous College Affiliated to K.B.C. North Maharashtra University, Jalgaon."
ESTD. 1945
NAAC Re-Accredited Grade "A" CGPA 3.15 (3rd Cycle)

## सोहम् डिपार्टमेंट ऑफ योग अॅण्ड नॅचरोपॅथी

9112288110 9422278411 9970985954 sohamdyn@kces.in / sohamnature@kces.in
http://mjcollege.kces.in

दिनांक: 12/ 12/2023

***ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त आयोजीत 'मोगरा फुलला.....' या विशेष कार्यक्रमाला श्रोत्यांचा उदंड प्रतिसाद***

मू. जे. महाविद्यालयाचे सोहम डिपार्टमेंट ऑफ योग अँड नॅचरोपॅथीच्या वतीने संत ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त 'मोगरा फुलला.....' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन ११ डिसेंबर रोजी करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाची निर्मिती के. सी. ई. सोसायटीचे कान्ह ललित कला केंद्र आणि सप्तसूर यांची होती. कार्यक्रमामध्ये कलावंतांनी ज्ञानेश्वर माऊलींचे आणि विविध संतांच्या रचनांचे गायन करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. दिप प्रज्वलन आणि माऊलींच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी मंचावर ॲड. पी. एन. पाटील सचिव के. सी. ई. सोसायटी,. श्री. डी. टी. पाटील कोषाध्यक्ष के. सी. ई. सोसायटी, के. सी. ई. चे सांस्कृतीक समन्वयक श्री. शाशिकांत वाडोदकर, डॉ. शिल्पा बेंडाळे संचालक आय. एम. आर., प्राचार्य सं. ना. भारंबे, आदि मान्यवर उपस्थित होते.

सोहम चे संचालक डॉ. देवानंद सोनार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले कान्हा ललित कला केंद्राचे संचालक प्रसाद देसाई यांनी कान्ह कला केंद्राची भूमिका स्पष्ट केली. शशिकांत वडोदकर यांनी कार्यक्रमाची पार्श्वभूमी स्पष्ट केली त्यानंतर गायक व वादक कलावंतांनी संतांच्या विविध रचना सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे निवेदन प्रा. गोपीचंद धनगर यांनी केले.

गायक कलावंतांमध्ये ज्ञानेश्वर पाथरवट, विवेक चव्हाण, अनुजा मंजुळ, अथर्व मंडले, यांनी सादरीकरण केले तर वाद्यवृंद साथसंगत तबला–राहुल कासार, संवादिनी– शौनक दीक्षित, पखवाज –उमेश सूर्यवंशी, बासरी – अनुष्का संत, टाळ – सुभाष तळेले यांनी दिली.

कार्यक्रमाचे आभार श्री. प्रसाद देसाई यांनी व्यक्त केले आणि पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ओजस्विनीचे प्रा. मिलन भामरे प्रा. पियुष बडगुजर, स्वरदा संगीत विभागाचे प्रा. कपिल शिंगाने, प्रा. देवेंद्र गुरव, नाट्यशास्त्र विभागाचे प्रा. हेमंत पाटील, प्रा. वैभव मावळे आणि श्री. कमलाकर पाटील यांचे सहकार्य लाभले. योगसाधक, संगीत व कला प्रेमी विद्यार्थी, रसिकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून लाभ घेतला.

संचालक
सोहम् डिपार्टमेंट ऑफ योग अॅण्ड नॅचरोपॅथी
मू. जे महाविद्यालय जळगाव (स्वायत्त )


सप्तसूर
कान्ह
कान्ह ललित कला केंद्र व सप्तसुर, जळगाव. निर्मित
महाविद्यालय संचालित, ( स्वायत्त )
सोहम डिपार्टमेंट ऑफ योग अ‍ॅण्ड नॅचरोपॅथी, जळगाव.
द्वारा आयोजित
संत ज्ञानेश्वर महाराज
यांच्या संजीवन समाधी
उत्सवा निमित्त विशेष
कार्यक्रम...
मोगरा फुलला
मोगरा फुलला


सप्तसूर
कान्ह
कान्ह ललित कला केंद्र व सप्तसुर, जळगाव. निर्मित
मु.जे. महाविद्यालय संचालित, ( स्वायत्त )
सोहम डिपार्टमेंट ऑफ योग अ‍ॅण्ड नॅचरोपॅथी, जळगाव.
द्वारा आयोजित
सोहम
संत ज्ञानेश्वर महाराज
यांच्या संजीवन समाधी
उत्सवा निमित्त विशेष
कार्यक्रम...
मोगरा फुलला
मोगरा फुलला

